सकाळ | कोल्हापूर
कोल्हापूर, शनिवार, ७ मे २०२२

# ...अन् सावलीच गायब झाली!

कोल्हापूर, ता. ६ : आपली सावली कधीच साथ सोडत नाही; मात्र, आज दुपारी १२ वाजून २९ मिनिटे ११ सेकंदापासून ते १२ वाजून ३० मिनिटेपर्यंत जवळ जवळ ५० सेकंदापर्यंत सावली चक्क अदृश्य झाली. ही सावली पायाखाली आली. त्यामुळे अनेकांना सावली गायब झाल्याचा अनुभव आला. विवेकानंद कॉलेजच्या प्रांगणात भौतिकशास्त्र व खगोल शास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर यांनी शून्य सावली दाखविण्यासाठी शास्त्रीय उपकरणांद्वारे विद्यार्थ्यांना माहिती दिली.

ते म्हणाले, "खगोलशास्त्रात या घटनेला शून्य सावली अथवा झिरो शॅडो म्हणतात. कर्क आणि मकर वृत्तामध्ये राहणाऱ्या लोकांना वर्षातून दोन वेळेला हा शून्य सावलीचा आनंद घेता येतो. या काळात आपण जर सावधान स्थितीत उभे राहून अथवा आपल्या जागेवरिती उडी मारून पहिले तर आपली सावली आपणास दिसणार नाही.

## आता ६ ऑगस्टला...

बरोबर तीन महिन्यांनी सूर्याच्या दक्षिणायन काळात ६ ऑगस्ट २०२२ ला दुपारी १२ वाजून ३९ मिनिटांपासून ५० सेकंदांपर्यंत परत एकदा शून्य सावलीचा आनंद घेता येणार आहे. पृथ्वी जसजशी फिरत जाईल तसे महाराष्ट्रात विविध स्थानी आपणाला शून्य सावलीचा आनंद घेता येतो, असे डॉ. कारंजकर म्हणाले.



कोल्हापूर : शिवाजी उद्यमनगर परिसरात भर दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास अनेकांना सावली गायब झाल्याचा अनुभव आला. (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)

लोकमत

epaper.lokmat.com

कोल्हापूर, शनिवार, दि. ७ मे २०२२



# ज्ञानेश्वरी पाटीलला कास्य पदक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : बंगळुरू येथे झालेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी खेळामध्ये ज्ञानेश्वरी जयवीर पाटील हिने नेमबाजीत कांस्य पदकाची कमाई केली. पिप साईट एअर रायफल प्रकारात तिने ६२५.४ स्कोअर केला.



ज्ञानेश्वरी ही विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. तिला संतोष जाधव हे नेमबाजीचे मार्गदर्शन करीत आहेत. तिला आई-वडिलासह आंतरराष्ट्रीय नेमबाज तेजस कुसाळे व रमेश कुसाळे हे देखील मार्गदर्शन करीत आहेत.

07/05/2022

PR 7.5.22

# सावली ५५ सेकंद गायब

## कोल्हापूरकरांनी घेतला अनुभव



विवेकानंद महाविद्यालयाच्या आवारात भौतिकशास्त्र आणि खगोलशास्त्र विभागाचे प्रा. डॉ. मिलिंद कारंजकर यांच्यासोबत विद्यार्थी, प्राध्यापकांनी दुपारी १२ वाजून २९ मिनिटे १० सेकंदापासून १२ वाजून ३९ मिनिटांपर्यंत शून्य सावलीचा खेळ अनुभवला.

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शून्य सावली दिवस अर्थात झिरो शॅडो डेमुळे कोल्हापूरकरांना शुक्रवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास ५५ सेकंद आपल्या सावलीला गमवावे लागले. खरं तर अनेकांना आपली सावली गायब कशी होणार याची उत्सुकता होती. प्रत्यक्षात सावली गायब झालेली नव्हती तर ती बरोबर आपल्या पायाखाली होती आणि ती न दिसल्यामुळे हा सावल्यांचा खेळ रंगला. या खेळाचा आनंद कोल्हापूर जिल्ह्यातील विज्ञानप्रेमी, महाविद्यालये आणि शिवाजी विद्यापीठातील अभ्यासू विद्यार्थी आणि हौशी कोल्हापूरकरांनी घेतला.

सोळांकुर येथील महाविद्यालयात प्रा. डॉ. अविराज जत्राटकर यांनी शून्य सावलीचा प्रयोग केला. दुपारी १२ वाजल्यापासून त्यांनी आणि त्यांच्या विद्यार्थ्यांनी निरीक्षण केले. सावली हळू हळू वस्तूकडे सरकू लागली आणि बरोबर १२ वाजून ३० मिनिटांनी ती गायब झाल्याचा अनुभव त्यांनी घेतला. नंतर सावली वस्तूपासून हळूहळू पूर्वेकडे सरकली. यावेळी अनेकांनी स्वतः जागेवर उभे राहून आपली सावली गायब झाली का याची खात्री केली; परंतु ज्यांनी जागेवरच उडी मारली, त्यांना त्यांची सावली दिसली.

07/05/2022